# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

## व्यवस्थापन परिषदेच्या २१३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## शनिवार, दि. ०२ मे, २०२६ रोजी सकाळी ११:०० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २१३ वी बैठक **शनिवार, दि. ०२ मे, २०२६ रोजी सकाळी ११:०० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश आण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ५) | डॉ. आय. जे. तांबोळी | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. अजयकुमार जाधव, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | डॉ. अ. सु. साळुंखे, I/C कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

**स्वागत:**

प्र.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. प्रशांत मारुती पवार यांनी ई-मेलद्वारे आपली अनुपस्थिती कळविली असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १ ] | १. दि. २३ मार्च, २०२६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २११ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>२. दि. २५ मार्च, २०२६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २१२ व्या बैठकीचा (तातडीची) कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १. दि. २३ मार्च, २०२६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २११ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतातील खालील ठरावात दुरुस्ती करुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र.७ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | पूर्वीचा ठराव | |
| | स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी केलेली विनंती व भारत सरकार राजपत्रात प्रसिध्द झालेली दि.०३/०४/२०२३ रोजीची विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना व महाराष्ट्र शासन पत्र दि.२६/०५/२०२३ रोजीच्या पत्रानुसार महाविद्यालयांना स्वायत्ता देण्याची भूमिका व विद्यापरिषदेने गठित केलेल्या समितीचा दि.२४/०२/२०२५ रोजीचा अहवाल विचारात घेऊन अशा स्वायत्त महाविद्यालयांना विविध संलग्नता शुल्क घ्यावे किंवा नाही याबाबत खालीलप्रमाणे सर्वानुमते धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.<br>१. स्वायत्त महाविद्यालयांकडून संलग्नता शुल्क घेण्यात येऊ नये असे सर्वानुमते ठरले.<br>२. प्रती विद्यार्थी, प्रती वर्ष रु.५००/- प्रमाणे Deta Handling Charges घेण्याचे सर्वानुमते ठरले.<br>३. प्रती विद्यार्थी रु.६००/- प्रमाणे दीक्षांत शुल्क (Convocation Fees) आकारण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. | संलग्नता विभाग |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर या महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी केलेली विनंती व भारत सरकार राजपत्रात प्रसिध्द झालेली दि.०३/०४/२०२३ रोजीची विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना व महाराष्ट्र शासन पत्र दि.२६/०५/२०२३ रोजीच्या पत्रानुसार महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याची भूमिका व विद्यापरिषदेने गठित केलेल्या समितीचा दि.२४/०२/२०२५ रोजीचा अहवाल विचारात घेऊन अशा स्वायत्त महाविद्यालयांना विविध संलग्नता शुल्क घ्यावे किंवा नाही याबाबत खालीलप्रमाणे सर्वानुमते धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.<br>१. स्वायत्त महाविद्यालयांकडून विविध संलग्नता शुल्क घेण्यात येऊ नये असे सर्वानुमते ठरले.<br>२. प्रती विद्यार्थी, प्रती वर्ष रु.२००/- प्रमाणे Data Handling Charges घेण्याचे सर्वानुमते ठरले.<br>३. प्रती विद्यार्थी रु.९००/- प्रमाणे दीक्षांत शुल्क (Convocation Fees) आकारण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. | |

| | | |
|---|---|---|
| | विषय क्र.१८ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | पूर्वीचा ठराव | |
| | दि.१८ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीमधील विषय क्र.०८ अन्वये स्वायत्त महाविद्यालयासंदर्भात नियमावली करण्यासाठी विद्यापरिषदेने नेमलेल्या डॉ.बी.पी.रोंगे समितीचा अहवालासंदर्भात खालीलप्रमाणे सर्वानुमते धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.<br>१. स्वायत्त महाविद्यालयांकडून संलग्नता शुल्क घेण्यात येऊ नये असे सर्वानुमते ठरले.<br>२. प्रती विद्यार्थी, प्रती वर्ष रु.५००/- प्रमाणे Deta Handling Charges घेण्याचे सर्वानुमते ठरले.<br>३. प्रती विद्यार्थी रु.६००/- प्रमाणे दीक्षांत शुल्क (Convocation Fees) आकारण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. | पी.जी.प्रवेश विभाग |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | दि.१८ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीमधील विषय क्र.०८ अन्वये स्वायत्त महाविद्यालयासंदर्भात नियमावली करण्यासाठी विद्यापरिषदेने नेमलेल्या डॉ. बी. पी. रोंगे समितीचा अहवालासंदर्भात खालीलप्रमाणे सर्वानुमते धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.<br>१. स्वायत्त महाविद्यालयांकडून विविध संलग्नता शुल्क घेण्यात येऊ नये असे सर्वानुमते ठरले.<br>२. प्रती विद्यार्थी, प्रती वर्ष रु.२००/- प्रमाणे Data Handling Charges घेण्याचे सर्वानुमते ठरले.<br>३. प्रती विद्यार्थी रु.९००/- प्रमाणे दीक्षांत शुल्क (Convocation Fees) आकारण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. | |
| | २. दि. २५ मार्च, २०२६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २१२ व्या बैठकीचा (तातडीची) कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २ ] | १. दि.०७ जानेवारी, २०२६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२. दि. ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २१० व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १. दि.०७ जानेवारी, २०२६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २०९ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>२. दि. ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या २१० व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३ ] | बी. टेक (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड कॉम्प्यूटर इंजिनिअरिंग) भाग-१ आणि एम. टेक. (इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग) भाग-१ हे नवीन अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणेकामी प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापठाच्या Under Graduate Courses Fee as per ordinance no १३०(i) & १३० (A) and Post Graduate Fee as per ordinance no १५१ New affiliation / Continuation / Extension of affiliation & Permanent affiliation या Ordinances मधील New Course नुसार बी. टेक व एम. टेक अंतर्गत येणाऱ्या नवीन अभ्यास पाठ्यक्रमाच्या प्रस्तावाचे शुल्क आकारुन अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | संलग्नता विभाग |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत नवीन अभ्यास पाठ्यक्रम सुरु करण्यासाठी खालील महाविद्यालयांचे या कार्यासनास प्रस्ताव प्राप्त झाले होते.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | प्रस्तावित नवीन अभ्यास पाठ्यक्रम | विद्यापीठाकडे जमा केलेले प्रस्ताव शुल्क (प्रस्ताव शुल्क + GST+ फॉर्म फी) |
|---|---|---|---|
| १) | ब्रम्हदेवदादा माने इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर | बी. टेक (आर्टिफिशियल इंटलिजन्स ॲन्ड डाटा सायन्स) भाग-१ | रु. २,००,००० + १८% GST + १,००० |
| २) | एस. के. एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, कोर्टी | बी. टेक (आर्टिफिशियल इंटलिजन्स ॲन्ड डाटा सायन्स) भाग-१ | रु. २,००,००० + १८% GST + १,००० |
| ३) | स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर | बी. टेक. (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड कॉम्प्यूटर इंजिनिअरींग) भाग-१ | रु. २५,००० + १८% GST + १,००० |
| ४) | स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर | एम. टेक (इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग) भाग-१ | रु. २५,००० + १८% GST + १,००० |

उपरोक्त नमूद तक्त्यातील अ. क्र. ३ मधील शुल्क कमी भरणा केल्यामुळे संबंधित महाविद्यालयास या विभागाकडून जा.क्र.:पुअहोसोविसो/संलग्नता/२०२४-२५/७८५, दि.२८ जानेवारी, २०२५ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या Ordiance मधील New course नुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून बी. टेक (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड कॉम्प्यूटर इंजिनिअरिंग) भाग-१ या अभ्यास पाठ्यक्रमाचे उर्वरित प्रस्ताव शुल्क १,७५,००० + १८% GST विद्यापीठाकडे जमा करणेबाबत अवगत करण्यात आले होते.

तसेच उपरोक्त नमूद तक्त्यातील अ. क्र. ४ मधील शुल्क कमी भरणा केल्यामुळे संबंधित महाविद्यालयास या विभागाकडून जा.क्र.:पुअहोसोविसो/संलग्नता/२०२४-२५/७८६, दि.२८ जानेवारी, २०२५ अन्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या Ordiance मधील New course नुसार शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून एम.टेक (इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग) भाग-१ या अभ्यास पाठ्यक्रमाचे उर्वरित प्रस्ताव शुल्क १,७५,००० + १८% GST विद्यापीठाकडे जमा करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु, संबंधित महाविद्यालयाने उर्वरित प्रस्ताव शुल्क जमा केले नाही.

याबाबत B.Tech. Electronics and Computer Engineering भाग-१ आणि M.Tech. Electrical Engineering भाग-१ या नवीन अभ्यास पाठ्यक्रमाच्या प्रस्ताव शुल्काबाबत अधिष्ठाता मंडळाच्या दि.२०/०३/२०२५ रोजीच्या बैठकीत विषय सादर केला असता, सदर विषयावर खालीलप्रमाणे ठराव पारित झालेला आहे.

ठराव: "शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर या महाविद्यालयाकडून बी. टेक (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड कॉम्प्यूटर इंजिनिअरिंग) भाग-१ आणि एम.टेक. (इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग) भाग १ हे नवीन अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या Under Graduate Courses Fee as per ordinance no १३०(i) & १३० (A) and Post Graduate Fee as per ordinance no १५१ New affiliation/Continuation/Extension of affiliation & Permanent affiliation या Ordinances मधील New Course नुसार बी. टेक. व एम. टेक. अंतर्गत येणाऱ्या नवीन अभ्यास पाठ्यक्रमाच्या प्रस्तावाचे उर्वरित प्रस्ताव शुल्क विद्यापीठाकडे जमा न केल्याच्या बाबीबाबत "आपल्या विद्यापीठाचे ordinance शिवाजी विद्यापीठाच्या Ordinance वर आधारित असल्याने, या विषयाबाबत संबंधित विभागाने शिवाजी विद्यापीठाकडून माहिती घेण्याचे सर्वानुमते ठरले".

वरीलप्रमाणे पारित झालेल्या ठरावानुसार प्रस्तुत विद्यापीठाकडून जा.क्र.: पुअहोसोविसो / संलग्नता / २०२४-२५ / ३०२९, दि.२१ एप्रिल २०२५ अन्वये उपकुलसचिव, संलग्नता विभाग T-२, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना कळविण्यात आले होते.

परंतु, वरील पत्रास प्रतिसाद न मिळल्यामुळे पुन्हा प्रस्तुत विद्यापीठाकडून जा.क्र. पुअहोसोविसो / संलग्नता / २०२५-२६ / ५७६०, दि.१७ जुलै २०२५ रोजी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना स्मरणपत्र पाठविण्यात आले होते.

त्यानुषंगाने, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे दि. २२ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शिवाजी विद्यापीठामध्ये मा. कुलपती यांनी मान्यता दिलेल्या संलग्नीकरण शुल्का संदर्भातील सुधारित दंडक सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात आले आहे. संलग्नीकरण शुल्कामध्ये दर तीन वर्षानंतर २०% शुल्क वाढ करण्यात मा. कुलपतींना मूळ शुल्क रचनेस मंजूरी देताना मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२६-२७ या कालावधीसाठी संलग्नीकरण शुल्कामध्ये २०% वाढ करण्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे.

त्याप्रमाणे शिवाजी विद्यापीठाकडून दि.२२ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रानुसार ज्या महाविद्यालयाची स्थापना पूर्वीपासूनच झालेली आहे अशा महाविद्यालयात नव्याने अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी B.Tech. Electronics and Computer Engineering Part-१ या नवीन अभ्यासक्रमास शुल्क रु. १,०३,६८०/- + रु.५००/- प्रस्ताव शुल्क (फॉर्म फी) आणि M. Tech. Electrical Engineering Part-१ नवीन अभ्यासक्रमास शुल्क रु. ४१,४७०/- + रु.५००/- प्रस्ताव शुल्क (फॉर्म फी) इतके शुल्क आकारले जाते असे नमूद केले आहे.

तसेच सदर पत्रासोबत जो शुल्क तक्ता जोडला आहे त्यामध्ये जे महाविद्यालय नव्याने सुरु होत आहे आणि नवीन अभ्यासक्रम सुरु करावयाचे आहे अशा अभ्यासक्रमासाठी Engineering (B.E./B.Tech.) New Affiliation Rs.४,१४,७२०/- per course आणि M.E./ M.Tech. New Affiliation Rs. ४१,४७०/- per branch per subject असे नमूद केलेले आहे.

सबब, बी. टेक (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड कॉम्प्यूटर इंजिनिअरिंग) भाग-१ आणि एम. टेक. (इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग) भाग-१ हे नवीन अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणेकामी प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या Under Graduate Courses Fee as per ordinance no १३०(i) & १३० (A) and Post Graduate Fee as per ordinance no १५१ New affiliation/Continuation/ Extension of affiliation & Permanent affiliation या Ordinances मधील New Course नुसार बी.टेक व एम. टेक अंतर्गत येणाऱ्या नवीन अभ्यास पाठ्यक्रमाच्या प्रस्तावाचे शुल्क आकारुन अधिष्ठाता मंडळाने व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ.

ठराव: **बी. टेक (इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड कॉम्प्यूटर इंजिनिअरिंग) भाग-१ आणि एम. टेक. (इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग) भाग-१ हे नवीन अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणेकामी प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापठाच्या Under Graduate Courses Fee as per ordinance no १३०(i) & १३० (A) and Post Graduate Fee as per ordinance no १५१ New affiliation / Continuation / Extension of affiliation & Permanent affiliation या Ordinances मधील New Course नुसार बी. टेक व एम. टेक अंतर्गत येणाऱ्या नवीन अभ्यास पाठ्यक्रमाच्या प्रस्तावाचे शुल्क आकारुन अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आल.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ४ ] | **दिनांक ११/०३/२०२५ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीतील ठराव क्र. ३१ अन्वये विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम सुरु करताना New Affiliation fee / New Course fee चे शुल्क न आकारता नवीन विषय सुरु करण्याबाबतचे शुल्क आकारण्याबाबत अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** | संलग्नता विभाग |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम सुरु करणेबाबत संलग्नता विभागाकडून Under Graduate Courses Fee as per ordinance no १३०(i) & १३० (A) and Post Graduate Fee as per ordinance no १५१ New affiliation / Continuation / Extension of affiliation & Permanent affiliation या अध्यादेशान्वये नवीन व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करणेकामी (B.Tech. (Engg.) / M.Tech. (Engg.) New course fee २,००,०००/- (२ लक्ष) इतके शुल्क आकारले जाते.

उपरोक्त अध्यादेशानुसार प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयांकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्राप्त झालेले प्रस्तावांसाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यात आलेले आहे.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | प्रस्तावित नवीन अभ्यासक्रम | विद्यापीठाकडे जमा केलेले प्रस्ताव शुल्क (प्रस्ताव शुल्क + GST+ फॉर्म फी) |
|---|---|---|---|
| १) | ब्रम्हदेवदादा माने इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर | बी. टेक (आर्टिफिशियल इंटलिजन्स ॲन्ड डाटा सायन्स) भाग-१ | रु. २,००,००० + १८% GST + १,००० |
| २) | एस. के. एन. सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, कोर्टी | बी. टेक (आर्टिफिशियल इंटलिजन्स ॲन्ड डाटा सायन्स) भाग-१ | रु. २,००,००० + १८% GST + १,००० |

दि.११ मार्च, २०२५ व १२ मार्च, २०२५ रोजी संपन्न झालेल्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. ३१ प्रमाणे-

"विद्यापीठ संलग्न असलेल्या महाविद्यालयात नवीन विषयाचा अभ्यासक्रम, उदा. अभियांत्रिकी महाविद्यालयात Artificial Intelligences and Machin Langague या विषयाचा अभ्यासक्रम, सुरु करण्यासाठी असे महाविद्यालय नव्याने सुरु करण्यासाठीचे शुल्क न आकारता नवीन विषयाचा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी लागणारे शुल्क आकारण्यात यावे अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस करीत आहे ".

| ठराव: | सदरचा प्रस्ताव श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी अनुमोदन दिले. त्यांनतर सर्वानुमते सदर प्रस्तावाची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |
|---|---|

| | | |
|---|---|---|
| | अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये B.Tech. अंतर्गत जेवढे (Civil Engg/Mech. Engg/E&Tc इ.) अभ्यासक्रम असतील त्या अभ्यासक्रमाचे स्वतंत्र पदवी प्रमाणपत्र दिले जात असल्याने, अशा अभ्यासक्रमांना विषय म्हणून न संबोधता नवीन अभ्यासक्रम म्हणून संबोधण्यात येते. त्यामुळे (New Subject) ची फी न आकारता नवीन अभ्यासक्रमाची (New Course) फी आकारण्यात येते.<br><br>New Subject चे प्रस्ताव हे पारंपारिक महाविद्यालयामध्ये B.A./B.Sc. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमातंर्गत येणारे विषय (उदा. मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, गणित, इतिहास, Physcis, Chemistry, Zoology इ.) ज्या महाविद्यालयांकडे उपलब्ध नसतील असे प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करणेबाबत विद्यापीठाकडे प्राप्त होतात. अशा अभ्यासक्रमातंर्गत येणाऱ्या विषयांना Ordinance मधील New Subject नुसार फी आकारली जाते.<br><br>सबब, दिनांक ११/०३/२०२५ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीतील ठराव क्र. ३१ अन्वये विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम सुरु करताना New Affiliation fee / New Course fee चे शुल्क न आकारता नवीन विषय सुरु करण्याबाबतचे शुल्क आकारण्याबाबत अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | |
| ठराव: | **दिनांक ११/०३/२०२५ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीतील ठराव क्र. ३१ अन्वये विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम सुरु करताना New Affiliation fee / New Course fee चे शुल्क न आकारता नवीन विषय सुरु करण्याबाबतचे शुल्क आकारण्याबाबत अधिसभेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ५ ] | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर च्या परिक्षेत्रात मुक्त विद्यापीठाचे केंद्र सुरु करण्यासाठी संबंधित महाविद्यालयाला विद्यापीठाची NOC घेणे बंधनकारक करणेबाबत अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्र शासनाच्या दि.२२ जुलै २००४ च्या राजपत्रान्वये झाली आहे. तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर असे नामविस्तार शासनाच्या दि.०५ मार्च, २०१९ च्या अधिसूचने अन्वये करण्यात आले आहे. सदर विद्यापीठाचे परिक्षेत्र पूर्ण सोलापूर जिल्हा असून सध्या या जिल्ह्यांतर्गत संलग्नित महाविद्यालयाची संख्या ११५ इतकी आहे. राज्यातील एका जिल्हयापुरते असलेले एकमेव अकृषी विद्यापीठ आहे.<br>तत्पूर्वी राज्य शासनाने पूर्ण राज्याकरिता राज्याच्या शिक्षण विषयक आकृतिबंधात दूरता शिक्षण पध्दती सुरु करण्यासाठी आणि त्यांचे प्रचलन करण्यासाठी सन १९८९ साली "यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ" या नावाचे एक विद्यापीठ नाशिक येथे स्थापन केले असून, सदर विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र आहे.<br>यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठासाठी शासनाने सन १९८९ मध्ये स्वतंत्र कायदा वा अधिनियम केला असून सदर कायद्यात कलम ३(२) मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.<br>"विद्यापीठाचे मुख्यालय हे नाशिक या ठिकाणी असेल व विद्यापीठ त्याला वाटेल त्या प्रमाणे राज्यातील इतर ठिकाणी संस्था, शाळा, प्रादेशिक केंद्रे स्थापन करु शकेल, चालवू शकेल किंवा त्यांना मान्यता देऊ शकेल".<br>वरील तरतूदीनुसार पूर्ण राज्यामध्ये कोठेही उदा. संबंधित महाविद्यालये, इतर संस्था, शाळा इ. ठिकाणी मुक्त विद्यापीठाचे केंद्र सुरु करता येते.<br>परंतु, सोलापूर जिल्हयासाठी एकमेव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या विद्यापीठाची स्थापना झालेली आहे. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांची संख्या ही ११५ इतकी असून, त्यातील काही महाविद्यालये ही स्वायत्त महाविद्यालये आहेत.<br>प्रस्तुत विद्यापीठातंर्गत संलग्नित ज्या महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे केंद्र चालतात त्या ठिकाणी नियमित प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे. याचा परिणाम संबंधित महाविद्यालय/संस्था आणि विद्यापीठावर होत आहे. त्यामुळे दि.१८ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या बैठकीत अधिसभेने सदरचा ठराव पारित केला आहे.<br>सबब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर च्या परिक्षेत्रात मुक्त विद्यापीठाचे केंद्र सुरु करण्यासाठी संबंधित महाविद्यालयाला विद्यापीठाची NOC घेणे बंधनकारक करणेबाबत अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | संलग्नता विभाग |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर च्या परिक्षेत्रात मुक्त विद्यापीठाचे केंद्र सुरु करण्यासाठी संबंधित महाविद्यालयाला विद्यापीठाची NOC घेणे बंधनकारक करणेबाबत दि.१८/०२/२०२६ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीतील ठराव क्र.६ अन्वये केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ६ ] | डॉ. सी. एच. कवचाळे चॅरिटेबल ट्रस्ट, इस्लामपूर या संस्थेचे संचलित कर्मयोगी श्री. हा. रा. कवचाळे कला व विज्ञान महाविद्यालय, बोराळे या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून ते शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासूनचे अशा एकूण ४ शैक्षणिक वर्षांचे बी. ए. भाग १ ते ३ आणि बी. एस्सी. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमांच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचे सादर न केलेल्या प्रस्तावांचे विलंब शुल्क ५०% पर्यंत कमी करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.<br>टिपणी:<br>संदर्भ:१) या कार्यासनाचे परिपत्रक्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२२-२३/५६९५, दि. २२/०७/२०२२<br>२) या कार्यासनाचे परिपत्रक क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२३/४२४२, दि. ११/०७/२०२३<br>३) या कार्यासनाचे परिपत्रक क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२४-२५/५२१०, दि. २२/०७/२०२४<br>४) या कार्यासनाचे परिपत्रक क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२५-२६/५९८०, दि. २५/०७/२०२५<br>५) या कार्यासनाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२५-२६/२१८१, दि. ११/०३/२०२६<br>६) मा. प्र. प्राचार्य, कर्मयोगी श्री. हा. रा. कवचाळे कला व विज्ञान महाविद्यालय, बोराळे यांचे पत्र क्र. क.श्री.हा.रा.क.म.बो.३३८/२०२५-२६, दि. १६/०३/२०२६<br>७) या कार्यासनाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०२५-२६/२६३४, दि. २५/०३/२०२६<br>८) मा. अध्यक्ष, डॉ. सी. एच. कवचाळे चॅरिटेबल ट्रस्ट, इस्लामपूर यांचे पत्र क्र. CHK/४७१/ २०२५-२६, दि. ०४/०४/२०२६<br>९) मा. अध्यक्ष, डॉ. सी. एच. कवचाळे चॅरिटेबल ट्रस्ट, इस्लामपूर यांचे पत्र क्र. CHK/४७२/ २०२५-२६, दि. ०४/०४/२०२६<br>१०) या कार्यासनाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/संल्ग्नता/२०२५-२६/३१२५, दि. ०९/०४/२०२६<br>प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांना संदर्भ क्र. १ ते ५ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून ते शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासूनचे पदवी व पदव्युत्तर पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांचे संलग्निकरणाचे नुतनीकरण व इतर प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.<br>तद्नंतर संदर्भ क्र. ६ अन्वये कर्मयोगी श्री. हा. रा. कवचाळे कला व विज्ञान महाविद्यालय, बोराळे या महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्यांनी दिनांक ११/०३/२०२६ रोजीच्या (संदर्भ क्र. ५) पत्राच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून ते शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासूनचे असे एकूण ४ शैक्षणिक वर्षांचे बी.ए. भाग १ ते ३ आणि बी.एस्सी. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमांच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणाच्या प्रस्तावाचे शुल्क, त्यावरील दंड व जी. एस. टी. रक्कम तात्काळ भरणा करणार असल्याने, याबद्दल सविस्तर माहिती मिळणेबाबत विनंती केली होती.<br>सदरील विनंतीच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ७ अन्वये उक्त महाविद्यालयास उक्त महाविद्यालयातील बी.ए. भाग १ ते ३ आणि बी. एस्सी. भाग १ ते ३ याअभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून ते शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अशा एकूण ४ शैक्षणिक वर्षांच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचे मार्च, २०२६ अखेरपर्यंतचे प्रस्तावाचे विहित शुल्क, विलंब शुल्क, १८% जी.एस.टी., फॉर्म फी याबाबत अभ्यासक्रमनिहाय तसेच सदरील प्रस्ताव स्वतंत्ररित्या तात्काळ सादर न केल्यास विद्यापीठाच्या अध्यादेशानुसार (Ordinance) प्रस्ताव सादर करेपर्यंत प्रतिमहा रु. १००० (अक्षरी रुपये एक हजार फक्त) दंड आकारण्यात येईल, असे कळविण्यात आले होते.<br>तद्नंतर संदर्भ क्र. ८ व ९ अन्वये मा. अध्यक्ष, डॉ. सी. एच. कवचाळे चॅरिटेबल ट्रस्ट, इस्लामपूर यांनी मा. कुलगुरु व मा. प्र-कुलगुरु यांना उद्देशून उक्त संस्थेचे संचलित कर्मयोगी श्री. हा. रा. कवचाळे कला व विज्ञान महाविद्यालय, बोराळे हे महाविद्यालय कार्यरत आहे. महाविद्यालय कायम विनाअनुदान तत्त्वावर असून ग्रामीण भागात ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभ्यासक्रमात विद्यार्थी संख्या अतिशय कमी आहे व त्यांची महाविद्यालयीन फी खूपच अल्प प्राप्त होते याउलट महाविद्यालयातील प्राध्यापक पगार, विद्यापीठ संलग्नता फी आणि इतर सर्व खर्च हे संस्थेला करावे लागतात. | संलग्नता विभाग |

संस्थेची आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक असलेने हे सर्व खर्च भागवणे अशक्य होत आहे. तरी विद्यापीठाने दिनांक २५/०३/२०२६ रोजीच्या पत्रानुसार जी संलग्नता फी, विलंब फी व त्यावरील जी.एस.टी. आकार भरण्याबाबत जी मागणी केली आहे ती संस्थेस भरणे शक्य होत नाही म्हणून विलंब शुल्क व जी.एस.टी. रक्कम माफ करावी म्हणजे उरलेली रक्कम विद्यापीठात जमा करणे सुलभ होईल. या वरील बाबींचा सकारात्मक विचार करुन योग्य निर्णय घेणेबाबत विनंती केली आहे.

तथापि, संदर्भ क्र. ८ वरील मा. कुलगुरु महोदयांना उद्देशून लिहिलेल्या पत्रावर मा.कुलगुरु महोदयांनी " To 'R' Please place before MC for reduction of penalty to ५०% " असे पृष्ठांकन केले आहे.

तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासूनच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणाकरिता बी. ए. व बी. एस्सी. या अभ्यासक्रमांचे शुल्क NEP २०२० नुसार घेण्याचे आदेश प्राप्त झालेले असल्याने, त्यानुषंगाने पुढील कार्यवाहीकरण्याकरिता संदर्भ क्र. १० अन्वये उक्त महाविद्यालयास बी. ए. आणि बी. एस्सी. या अभ्यासक्रमाचे NEP २०२० नुसार महाविद्यालयातील विषयांची यादी दिनांक १०/०४/२०२६ रोजी दुपारी ४.०० वा. पर्यंत सादर करणेबाबत कळविण्यात आले होते. परंतु, महाविद्यालयाकडून अद्यापपर्यंत सदरील माहिती अप्राप्त आहे.

उक्त महाविद्यालयातील बी. ए. भाग १ ते ३ आणि बी. एस्सी. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमांच्या संलग्निकरणाचे नुतनीकरणाच्या प्रस्तावांचे एप्रिल, २०२६ अखेरपर्यंतचे विहित शुल्क, विलंब शुल्क, १८% जी.एस.टी. व फॉर्म फी खालील तक्त्यात स्वतंत्ररित्या नमूद केली आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | शैक्षणिक वर्ष | विहित शुल्क | एप्रिल,२०२६ अखेरपर्यंतचे विलंब शुल्क | १८% जीएसटी | फॉर्म फी | एकूण शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | बी. ए. भाग १ ते ३ | २०२३-२४ पासून | १५०००/- | ४३०००/- | १०४४०/- | ५००/- | ६८९४०/- |
| २) | बी. ए. भाग १ ते ३ | २०२४-२५ पासून | १५०००/- | ३१०००/- | ८२८०/- | ५००/- | ५४७८०/- |
| ३) | बी. ए. भाग १ ते ३ | २०२५-२६ पासून | १५०००/- | १९०००/- | ६१२०/- | ५००/- | ४०६२०/- |
| ४) | बी. ए. भाग १ ते ३ (Edu. Lab. मार्फत Online द्वारे प्रस्ताव सादर करणे.) | २०२६-२७ पासून | NEP २०२० चे आपल्या महाविद्यालया मध्ये घेतले जाणारे विषय त्यास प्रति विषय १०००/- प्रमाणे करुन एकूण विहित शुल्क भरणे. | ७०००/- | १२६०/- + विहित शुल्काचा व विलंब शुल्काचा १८% जी.एस.टी | ५००/- | ८७६०/- + विहित शुल्क + विहित शुल्काचा व विलंब शुल्काचा १८% जी.एस.टी |
| ५) | बी. एस्सी. भाग १ ते ३ | २०२३-२४ पासून | ८५००/- | ४३०००/- | ९२७०/- | ५००/- | ६१२७०/- |
| ६) | बी. एस्सी. भाग १ ते ३ | २०२४-२५ पासून | ८५००/- | ३१०००/- | ७११०/- | ५००/- | ४७११०/- |
| ७) | बी. एस्सी. भाग १ ते ३ | २०२५-२६ पासून | ८५००/- | १९०००/- | ४९५०/- | ५००/- | ३२९५०/- |
| ८) | बी. एस्सी. भाग १ ते ३ (Edu. Lab. मार्फत Online द्वारे प्रस्ताव सादर करणे.) | २०२६-२७ पासून | NEP २०२० चे आपल्या महाविद्यालया मध्ये घेतले जाणारे विषय त्यास प्रति विषय १०००/- प्रमाणे करुन एकूण विहित शुल्क | ७०००/- | १२६०/- + विहित शुल्काचा व विलंब शुल्काचा १८% जी.एस.टी | ५००/- | ८७६०/- + विहित शुल्क + विहित शुल्काचा व विलंब शुल्काचा १८% जी.एस.टी. |

| | | |
|---|---|---|
| | उपरोक्त तक्त्यातील स्तंभ क्र. ५ मधील एकूण विलंब शुल्क रु. २,००,००० (अक्षरी रु. दोन लक्ष) फक्त व त्यावरील १८% जी. एस. टी. रु. ३६,००० (अक्षरी रु. छत्तीस हजार) फक्त आहे.<br>सबब, डॉ. सी. एच. कवचाळे चॅरिटेबल ट्रस्ट, इस्लामपूर या संस्थेचे संचलित कर्मयोगी श्री.हा.रा.कवचाळे कला व विज्ञान महाविद्यालय, बोराळे या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून ते शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासूनचे अशा एकूण ४ शैक्षणिक वर्षांचे बी. ए. भाग १ ते ३ आणि बी. एस्सी. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमांच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचे सादर न केलेल्या प्रस्तावांचे विलंब शुल्क ५०% पर्यंत कमी करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | |
| ठराव: | डॉ. सी. एच. कवचाळे चॅरिटेबल ट्रस्ट, इस्लामपूर या संस्थेचे संचलित कर्मयोगी श्री. हा. रा. कवचाळे कला व विज्ञान महाविद्यालय, बोराळे या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून ते शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासूनचे अशा एकूण ४ शैक्षणिक वर्षांचे बी. ए. भाग १ ते ३ आणि बी. एस्सी. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमांच्या संलग्निकरणाच्या नुतनीकरणाचे सादर न केलेल्या प्रस्तावांचे नियमानुसार विलंब शुल्क आकारुन प्रस्ताव स्विकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ७ ] | **"उत्कृष्ट व्यवस्थापन परिषद सदस्य" या पुरस्काराची नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने तयार केलेली नियमावली विचारार्थ.**<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या बैठकीतील विषय क्र. १६(५) वरील ठरावानुसार "उत्कृष्ट व्यवस्थापन परिषद सदस्य" हा पुरस्कार देण्यासाठी पुरस्काराचे स्वरुप व नियमावली तयार करण्यासाठी समिती गठीत केली होती. सदर समितीची दि.०४/०४/२०२६ रोजी दुपारी ०१:३० वाजता ऑनलाईव्दारे बैठक संपन्न झाली. सदरच्या गठीत समितीने "उत्कृष्ट व्यवस्थापन परिषद सदस्य" पुरस्काराकरिता नियमावली तयार करुन ई-मेलव्दारे पाठविली आहे.<br>सबब, "उत्कृष्ट व्यवस्थापन परिषद सदस्य" या पुरस्कारासाठी गठीत समितीकडून सोबत जोडल्याप्रमाणे तयार करण्यात आलेली नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **"उत्कृष्ट व्यवस्थापन परिषद सदस्य" या पुरस्काराची नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीने तयार केलेल्या नियमावलीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच सदरचा पुरस्कार विद्यापीठ वर्धापन दिनादिवशी देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ८ ] | **प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील संगणकशास्त्र संकुलाकडे KOEL-८२.५ KVA Generator ची डिझेल खरेदी करणे व त्याचे देखभाल दुरुस्ती इ. कामे अभियांत्रिकी विभागाकडे वर्ग करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील संगणकशास्त्र संकुलाकडे KOEL-८२.५ KVA Generator कार्यरत असून सद्य:स्थितीत महावितरण यांचेकडून विजेचा पुरवठा खंडीत झाल्यानंतर संकुलाकडील सर्व कामकाज जनरेटरवर चालू राहते. तथापि, विद्यापीठातील मुख्य सभागृहाला देखील संगणकशास्त्र संकुलातील जनरेटरचे कनेक्शन दिलेले असल्यामुळे विजेचा प्रवाह खंडीत झाला असता, मुख्य सभागृहातील सर्व कार्यक्रमांसाठी संकुलातील जनरेटरचा वापर केला जातो. संकुलाकडील दैनंदिन कामकाजाकरिता जनरेटरकरिता संकुलाकडून एका वेळेस अंदाजे १०० लिटर डिझेल खरेदी केले जाते. तथापि, वीज प्रवाह खंडीत झाल्यानंतर जनरेटरचा वापर संकुलाकरिता व विद्यापीठ मुख्य सभागृहातील कार्यक्रमांसाठी व विद्यापीठाच्या इतर महत्वाच्या बैठकांसाठी देखील वापर होत असल्यामुळे जनरेटरमधील डिझेलचा जास्त वापर होत असून डिझेल लवकर संपत आहे. संकुलाकडून पुनश्च: डिझेल खरेदी करुन जनरेटरचा वापर करण्यासाठी बराचसा कालावधी लागत आहे. डिझेल लवकर संपत असल्यामुळे वीज नसताना संकुलातील दैनंदिन व्याख्याने, प्रात्यक्षिके व कार्यालयीन कामकाज इ. सर्व कामे थांबत आहेत. त्यासोबत मुख्य सभागृहातील कार्यक्रम व महत्वाच्या बैठकांच्या कामकाजामध्ये अडथळा निर्माण होत आहे. तसेच जनरेटरमधील तांत्रिक बाबींचे ज्ञान संकुलाकडील कर्मचाऱ्यांना नसल्यामुळे जनरेटरचे देखभाल व दुरुस्ती इ. कामे संकुल स्तरावर करताना अडचणी निर्माण होत आहे. तरी जनरेटरसाठी डिझेल खरेदी करणे व जनरेटरचे देखभाल व दुरुस्ती इ. बाबींचे अवलोकन केले असता, संगणकशास्त्र संकुलाकडील KOEL-८२.५ KVA Generator करिता डिझेल खरेदी करणे व त्याचे देखभाल - दुरुस्ती इ. कामे अभियांत्रिकी विभागाकडे वर्ग करण्याबाबत दि.२७/०३/२०२६ रोजीची मा.प्र.कुलसचिव महोदय यांची मान्यता घेऊन विभागाकडे अंतर्गत कार्यालयीन टिपणीद्वारे कळविण्यात आले आहे.<br>सदरची बाब विभागाच्या निदर्शनास आली असता, मुख्य सभागृहाचा वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर भैतिकशास्त्र संकुलाकडील जनरेटरचा पूर्ण वापर केला जातो. सभागृहातील बैठक, व्याख्याने, प्रात्यक्षिके व कार्यालयीन कामे वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर व भौतिकशास्त्र संकुलाकडील जनरेटरला काही तांत्रिक बिघाड / डिझेल संपल्यानंतर तात्काळ संगणकशास्त्र संकुलाच्या जनरेटरचा जोडण्यात आला आहे. ते ही वर्षभरातून १ किंवा २ वेळा होत असते.<br>संगणकशास्त्र संकुलाकडे जनरेटरच्या डिझेल खरेदीकरीता स्वतंत्र अंदाजपत्रक व तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सद्य:स्थितीत जगभरामध्ये इंधनाचा पुरवठा कमी झाल्यामुळे जे शासकीय कार्यालय पूर्वीपासून डिझेल खरेदी करतात त्यांना डिझेल उपलब्ध करुन देण्यात येत आहे. | अभियांत्रिकी विभाग |

| | | |
|---|---|---|
| | संगणकशास्त्र संकुलाकडील जरनेटर करिता डिझेल बाबत अडचण निर्माण झाल्याने संकुलाकडून मा.प्र.कुलसचिव महोदयांची मान्यता घेऊन विभागाकडे अंतर्गत कार्यालयीन टिपणीद्वारे कळविण्यात आले आहे.<br>यापूर्वी काही कारणास्तव व्यवस्थापन परिषदेच्या दि.२४/०७/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये विषय क्र. ३ अन्वये मुलांच्या वसतिगृहातील Generator सेट खरेदी करण्याची बाब विचारार्थ सादर केला असता, खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला. | |
| ठराव क्र. ३ | मुलींच्या वसतिगृहासाठी Generator सेट खरेदी करण्यासाठी तांत्रिक समितीने दिलेल्या Technical Specification नुसार खरेदी करण्यास व त्याकरिता येणारा अंदाजे खर्च रु.७,५०,०००/- इतका Development Budget Part -II Revised Estimate २०२२-२३ and Budget Estimate for २०२३-२४ (University Hostel २०२३-२४ रु.२२,००,०००/-) या अंदाजपत्रकीय तरतूदीतून करण्यास सर्वानुमते मान्यत देण्यात आली. | |
| | उक्त ठरावामध्ये दि.२५/१०/२०२३ रोजी सादर केला असता, खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला. | |
| अ.क्र. १ | दि.२४ जुलै, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६० व्या बैठकीतील विषय क्र.३ वर झालेल्या ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली आहे.<br>दुरुस्ती ठराव<br>मुलींच्या वसतिगृहासाठी Generator सेट खरेदी करण्याऐवजी सामाजिकशास्त्रे संकुल येथे असलेला Generator वर सामाजिकशास्त्रे संकुल, मुलींचे वसतिगृह, आरोग्य विभाग व ॲग्रो-टुरीझम हे विभाग / संकुले जोडण्यात येवून Generator चे देखभाल व दुरुस्ती अभियांत्रिकी विभागाकडून करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. | |
| | उक्त ठराव दिनांक २५/१०/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये विषय क्र.१ अन्वये सादर केला असता, त्यास मान्यता देण्यात आली.<br>सबब, संगणकशास्त्र संकुलाकडे KOEL-८२.५ KVA Generator करीता डिझेल खरेदी करणे व जनरेटरचे देखभाल - दुरुस्ती इ. कामे अभियांत्रिकी विभागाकडे वर्ग करण्याकरीता सादर केलेली अंतर्गत कार्यालयीन टिपणीप्रमाणे कार्यवाही करण्याची बाब विचारार्थ. | |
| **ठराव:** | **प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्वंच Generator ची डिझेल खरेदी करणे व त्यांची देखभाल दुरुस्ती व इतर अनुषंगिक कामे अभियांत्रिकी विभागाकडून करण्यात यावीत असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०९ ] | **विद्यापीठाचे महिंद्रा बोलेरो वाहन क्र. MH 13 AZ 6819, MH 13 AZ 5820 व टोयोटा इटिऑस वाहन क्र. MH 13 AZ 2649 वाहने प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून काढून देण्यात आलेल्या बाजारभाव किंमतीप्रमाणे जाहीर लिलाव पध्दतीने विक्री करण्याची बाब विचारार्थ.** | अभियांत्रिकी विभाग |

टिपणी: विद्यापीठाची टोयोटा इटिऑस वाहन क्र. MH 13 AZ 2649, महिंद्रा बोलेरो वाहन क्र. MH 13 AZ 5820 व महिंद्रा बोलेरो वाहन क्र.MH 13 AZ 6819 या वाहनांच्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील नोंदीनुसार वयोमान कमी होत आले आहे.

वरील वाहनाच्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालाकडील नोंदीचा व आर्युमान संपण्याच्या नोंदीचा कालावधी खालील तक्त्यात नमुदप्रमाणे आहे.

| अ.क्र | वाहनाचा प्रकार | वाहनाचा नंबर | उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे वाहन नोंदणी झालेला दिनांक | उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील वाहन नोंदणी दिनांकानुसार वाहन अंतिम आयुर्मान दिनांक |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | टोयोटा इटिऑस | MH 13 AZ 2649 | ०२/०१/२०१२ | ०१/०१/२०२७ |
| २ | महिंद्रा बोलेरो | MH 13 AZ 5820 | २९/१०/२०१२ | २८/१०/२०२७ |
| ३ | महिंद्रा बोलेरो | MH 13 AZ 6819 | ०२/०१/२०१३ | ०१/०१/२०२८ |

उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे विद्यापीठाच्या वाहनांचे त्या-त्या वाहनांच्या समोर रकाना क्र.५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे तारखेला वयोमान संपणार आहे.

तसेच मा.परिवहन आयुक्त, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे कार्यालयाकडील पत्र क्रमांक एमव्हीआर-११८८/सीआर-४६४/Aका.२(३) जा.क्र.८४७१ या पत्राच्या अनुषंगाने केंद्रशासनाच्या Scheme For Special Assistance to Status for Capital Investment For २०२२-२३ अंतर्गत प्राप्त निर्देशानुसार नोंदणी दिनांकापासून १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी राज्य शासनाच्या मालकीची वाहने निष्कासीत (Scrap) करण्यासंदर्भात निर्देश जारी झालेबाबत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांचेकडून दि.०६/०१/२०२३ रोजीच्या ई-मेल सोबत प्राप्त झालेल्या जा.क्र. ६३ / आस्थापना विभाग / उपप्रापका / सोलापूर / २०२२, दि.०५/०१/२०२३ रोजीच्या पत्रानुसार या कार्यालयास कळविले आहे.

तसेच महाराष्ट्र शासन परिवहन आयुक्त यांचे कार्यालयाकडील पत्र क्र. एमव्ही आर-११८८ /सीआर-४६४A/का.२(३) जा.क्र.८४७१ दि.२०/०७/२०२३ या पत्रानुसार शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे (S.T.U) सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि राज्य शासनाच्या मालकीच्या वा नियंत्रणाखालील स्वायत्त संस्था/मंडळे इ. यांचे नावे नोंदणीकृत असणारी १५ वर्षे पेक्षा जास्त वयाची वाहने स्क्रॅप/मोडीत काढण्याची प्रक्रिया पूर्ण राज्यात सुरु आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त पत्रांच्या अनुषंगाने, उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे विद्यापीठाची वाहने संबंधीत वाहनाच्या रकाना क्र. ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे दिनांकास स्क्रॅप होणार आहेत. उपरोक्त पत्रातील निर्देशानुसार सदर वाहनांचे वयोमान स्तंभ क्र.५ मध्ये नमुद दिनांकाच्या पुढे वाढवता येत नसल्याने तसेच उपरोक्त वाहने जुनी झाली असल्यामुळे सर्व्हिसींग व दुरुस्तीचा खर्च मोठ्या प्रमाणात काढत आहेत. सदर वाहनांचा या पुढे जास्त वापर झाल्यास वाहनाची किंमत कमी होत जाणार आहे. त्याचप्रमाणे सदरची वाहने उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे रकाना क्र ५ मध्ये नमुद केलेल्या त्या वाहनाच्या वयोमानाच्या अंतिम दिनांकापर्यंत वापरल्यास वाहने संबंधीत वाहनाच्या कंपनीकडे बायबॅक करता येणार नाहीत किंवा विकता ही येणार नाहीत. वाहनाचे वयोमान १५ वर्षे पुर्ण झाले असल्यामुळे वाहने निष्काषीत (Scrap) होणार आहेत. तत्पुर्वी वाहने विक्री झाली तर वाहनास योग्य किंमती प्राप्त होतील.

वरील विषयांकीतप्रमाणे विद्यापीठाच्या तिन्ही वाहनांच्या खरेदी दिनांकाचा, खरेदी किंमतीचा दुरुस्तीसाठी झालेल्या खर्चाचा, धाव किमीचा व दि.३१ मार्च, २०२६ अखेर पर्यंत वित्त व लेखा विभागाकडून घेण्यात आलेल्या घसारा किंमतीचा तपशील खालील तक्त्यात नमुदप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | वाहन क्रमांक | दिनांक व खरेदी किंमत | वाहनासाठी झालेला खर्च रुपये (आजअखेर) | धाव (कि.मी.) | घसारा किंमत (दि.३१ मार्च, २०२६ अखेर) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | MH 13 AZ 2649 | 7,80,856/- | 6,40,135 | 237185 | 1,60,769/- |
| 2. | MH 13 AZ 5820<br>MH 13 AZ 6819 | 13,29,970/- | 7,41,584/-<br>5,11,968/- | 349574<br>265647 | 3,08,929/- दोन्ही वाहनांची एकत्रित |

उपरोक्त बाब अवलोकनी घेता उक्त तक्त्यात नमुदप्रमाणे विद्यापीठाची वाहने विक्री करण्यासाठी The Maharashtra Account Code - Appendix - III (८) (A) नुसार मा. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, सोलापूर या कार्यालयाकडून मुल्यांकन काढून घेण्यासाठी प्रशासकीय मान्यता घेऊन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर या कार्यालयास उक्त तक्त्यात नमुदप्रमाणे वाहनांच्या चालू बाजारभावानुसार विक्री किंमती काढून देण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला होता.

वरीलप्रमाणे केलेल्या पत्रव्यवहारास अनुसरुन मा. प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, सोलापूर यांचेकडून सदर तिन्ही वाहनांच्या विक्रीबाबत बाजारभावानुसार मुल्यांकन करुन याबाबतचे बंद पाकीट विद्यापीठास सादर केले आहे. सदरचे बंद पाकीट मा.कुलसचिव व वित्त व लेखा अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले आहे.

वरीलप्रमाणे विषयांकीत तिन्ही वाहनांच्या विक्रीची किंमत खालील तक्त्यात नमुदप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मोटार वाहन क्रमांक / बनावट / प्रकार / मॉडेल | बा. भा. किंमत |
|---|---|---|
| १. | मो.वा.क्र. MH 13 AZ 2649 / बनावट - टोयोटा किर्लोस्कर मोटार प्रा.लि. / प्रकार-LMV(NT) / मॉडेल- Toyota Etios GD | २,३०,०००/- |
| २. | मो.वा.क्र. MH 13 AZ 6819 / बनावट - महिंद्रा ॲन्ड महिंद्रा लि. / प्रकार-LMV(NT) / मॉडेल - Bolero SLE 2 WD 7-Seater AC BS3 | २,१९,०००/- |
| ३. | मो.वा.क्र. MH 13 AZ 5820 / बनावट - महिंद्रा ॲन्ड महिंद्रा लि. / प्रकार-LMV(NT) / मॉडेल - Bolero LX 2WD 7-Seater AC BS3 | २,४४,०००/- |

सबब, उपरोक्त तक्त्यात नमुदप्रमाणे विद्यापीठाच्या ०३ वाहनांची प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांनी काढून दिलेल्या बाजारभाव किंमतीप्रमाणे जाहीर लिलाव पध्दतीने विक्री करण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **विद्यापीठाकडील खालील वाहने तक्यात नमूद किंमतीप्रमाणे जाहीर लिलाव पध्दतीने विक्री करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | मोटार वाहन क्रमांक / बनावट / प्रकार / मॉडेल | बा. भा. किंमत |
|---|---|---|
| १. | **मो.वा.क्र. MH 13 AZ 2649 / बनावट - टोयोटा किर्लोस्कर मोटार प्रा.लि. / प्रकार-LMV(NT) / मॉडेल- Toyota Etios GD** | २,००,०००/- |
| २. | **मो.वा.क्र. MH 13 AZ 6819 / बनावट - महिंद्रा ॲन्ड महिंद्रा लि. / प्रकार-LMV(NT) / मॉडेल - Bolero SLE 2 WD 7-Seater AC BS3** | २,००,०००/- |
| ३. | **मो.वा.क्र. MH 13 AZ 5820 / बनावट - महिंद्रा ॲन्ड महिंद्रा लि. / प्रकार-LMV(NT) / मॉडेल - Bolero LX 2WD 7-Seater AC BS3** | २,००,०००/- |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **विद्यापीठ संलग्नित एखाद्या संस्थेअंतर्गत वाद असल्यामुळे (CAS) शिक्षक पदोन्नती समितीमध्ये संस्था प्रतिनिधी उपस्थित राहत नसल्यास त्या CAS समितीमधील मा.कुलगुरुंचे प्रतिनिधी यांनी शिक्षक पदोन्नती समितीचे अध्यक्ष म्हणून प्रक्रिया पूर्ण करावी अशी सर्वानुमते अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी सदरचा ठराव मांडण्यासाठी आपला प्रस्ताव अधिसभेला पाठविला होता.<br>अधिसभेने विद्यापीठ संलग्नित एखाद्या संस्थेअंतर्गत वाद असल्यास कॅस अंतर्गत शिक्षकाच्या पदोन्नतीकरिता विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या निवड समितीतील संस्थेचे अध्यक्ष उपस्थित राहत नसल्यास विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या निवड समितीमधील मा.कुलगुरु यांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधीने त्या कॅस समितीचे अध्यक्ष म्हणून प्रक्रिया पूर्ण करावी अशी दि. १८/०२/२०२६ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. २० नुसार केलेली आहे.<br>याबाबत सादर करण्यात येते की, प्रस्तृत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांच्या स्थाननिश्चिती / पदोन्नतीकरिता प्रस्ताव विभागास प्राप्त झाल्यानंतर कॅस प्रक्रिया राबविण्याकरिता विद्यापीठ अनुदान आयोग अधिसूचना दि.१८/०७/२०१८ मधील तरतूदीनुसार समिती देण्यात येते. कॅस अंतर्गत सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक पदासाठी विद्यापीठ अनुदान आयोग अधिसूचना दि. १८/०७/२०१८ मधील ५.१ (VI/VII) खालील प्रमाणे निवड समिती देण्यात येते<br>a) The Selection Committee for the post of Associate Professor & Professor in Colleges including Private and Constituent Colleges shall consist of the following persons<br>i. Chairperson of the Governing Body or his/her nominee from amongst the members of the Governing body<br>ii. The Principal of the College<br>iii. The Head of the Department/Teacher-In charge of the concerned subject form the college<br>iv. Two nominees of the Chairperson of the college from out of a panel of five names, preferably from the minority community recommended by the Vice-Chancellor of the affiliating university, from the list of experts suggested by the relevant statutory body of the college, of whom one should be a subject expert. | शिक्षक मान्यता विभाग |

v. Two subject experts not connected with the University nominated by the Chairperson of the Governing Body of the College out of the panel of five names, preferably from the minority communities, recommended by the Vice-Chancellor from the list of subject experts approved by the relevant statutory body of the College.

vi. An academician belonging to the SC / ST / OBC / Minority / Women / Different-abled categories, if any of candidates belonging to these categories is the applicant, to be nominated by the vice-chancellor, if any of the above members of the selection committee does not belong to that category.

b) The quorum for the meeting shall be five, including two subject expert.

उपरोक्त प्रमाणे निवड समितीची रचना असून सदर समितीमध्ये अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित असणे आवश्यक आहे. तसेच कुठल्याही बैठकीस समितीमधील अध्यक्षांची उपस्थिती आवश्यक असते. तथापि, अध्यक्ष उपस्थित नसतील तर अध्यक्षांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधीची उपस्थिती आवश्यक असते. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनामध्ये अ.क्र. i मधील संस्थेचे अध्यक्ष नसतील तर मा. कुलगुरु नियुक्त प्रतिनिधी यांनी अध्यक्ष म्हणून कॅस प्रक्रिया पूर्ण करावी असे कुठेही उल्लेख दिसून येत नाही, जर मा.कुलगुरु नियुक्त प्रतिनिधीस कॅस प्रक्रियेमध्ये संस्थेचा अध्यक्ष म्हणून कॅस प्रक्रिया पूर्ण करण्याचा अधिकार दिल्यास विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेस छेद दिल्याप्रमाणे होईल. तसेच संस्थेच्या अधिकारावर हस्तक्षेप केल्यासारखा होईल. समितीच्या रचनेमध्ये पाच जणांची उपस्थिती आवश्यक असून त्यामध्ये दोन विषयतज्ञ आणि उर्वरित तीन मध्ये संस्थेचे अध्यक्ष उपस्थित असणे आवश्यक आहे.

सबब, विद्यापीठ संलग्नित एखाद्या संस्थेअंतर्गत वाद असल्यामुळे (CAS) शिक्षक पदोन्नती समितीमध्ये संस्था प्रतिनिधी उपस्थित राहत नसल्यास त्या कॅस समितीमधील मा.कुलगुरुंचे प्रतिनिधी यांनी शिक्षक पदोन्नती समितीचे अध्यक्ष म्हणून प्रक्रिया पूर्ण करावी अशी सर्वानुमते अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव:** दि.१८/०२/२०२६ रोजी झालेल्या अधिसभेच्या बैठकीतील ठराव क्र.२० अन्वये केलेली शिफारस खालील दुरुस्तीसह स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विद्यापीठ संलग्नित एखाद्या संस्थेअंतर्गत वाद असल्यामुळे (CAS) शिक्षक पदोन्नती समितीमध्ये संस्था प्रतिनिधी उपस्थित राहत नसल्यास संबंधित संस्थेस पत्र लिहून ४५ दिवसाच्या आत संस्था प्रतिनिधी उपलब्ध करुन द्यावा व (CAS) शिक्षक पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करुन घ्यावी. असे न केल्यास त्यासंदर्भातील सर्व अधिकार विद्यापीठाकडे असतील असे सर्वानुमते ठरले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ११ ] | **श्रीमती सुरांजली लक्ष्मण सोनकांबळे, सहायक प्राध्यापक, कर्मवीर औदुंबर पाटील लॉ कॉलेज, पंढरपूर यांना चेंजेस इन स्टाफ करीता अर्ज सादर करण्यास विलंब झाला असल्याने लागू होत असलेल्या दंडामध्ये शिथिलता मिळणेबाबत केलेला विनंती अर्ज विचारार्थ.**<br>टिपणी: श्रीमती सुरांजली लक्ष्मण सोनकांबळे, सहायक प्राध्यापक, कर्मवीर औदुंबर पाटील लॉ कॉलेज, पंढरपूर यांची विद्यापीठ निवड समितीने रितसर सन २०१३ मध्ये सहायक प्राध्यापक म्हणून नियुक्ती झालेली आहे. त्यांनी विद्यापीठाची चेंजेस इन स्टाफची मान्यता आजतागायत घेतली नसून त्यांना माहित नसल्याचे पत्रामध्ये नमूद केलेली आहे. (प्रस्तुत विभागाकडील दि.०६/०८/२०१० रोजीच्या परिपत्रकानुसार शिक्षकांची नेमणूक तारखेपासून दोन वर्षानंतर चेंजिस इन स्टाफ फॉर्म विद्यापीठाकडे दाखल करतील अशा शिक्षकांना प्रतीवर्षी रु. १,०००/- प्रमाणे दंड आकारण्यात येतो.) त्यानुसार सन २०१३ पासून आजतागायत दंडाची रक्कम रु.१३,०००/- नियमाप्रमाणे होत असल्याने त्यांनी सदर पत्रामध्ये कार्यरत असलेले महाविद्यालय विनाअनुदानित असल्याने त्यांची दंडाच्या रक्कमेबाबत शिथिलता मिळणेबाबत व दंडाची रक्कम कमी करुन मिळणेबाबत विनंती केलेली आहे.<br>वरील बाबत कार्यालयीन निवेदन असे की, श्रीमती सुरांजली लक्ष्मण सोनकांबळे यांची रितसर विद्यापीठ निवड समितीने पूर्णवेळ सहायक प्राध्यापक म्हणून विद्यापीठाचे दि.०२/०९/२०१३ रोजीच्या पत्रान्वये मान्यता देण्यात आलेली असल्याचे सादर केलेल्या प्रस्तावावरुन दिसून येते. तसेच त्यांचे चेंजेस इन स्टाफचे प्रस्ताव कर्मवीर औदुंबर पाटील लॉ कॉलेज, पंढरपूर यांनी मान्यता पत्र मिळाल्यानंतर शिक्षकाची नेमणूक स्विकारल्यानंतर शिक्षक हजर होताच सदरचा प्रस्ताव विनाविलंब विद्यापीठास सादर करणेबाबत विद्यापीठाच्या मान्यता पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठास सादर करणे अपेक्षित होते. परंतू सदर महाविद्यालयाने चेंजेस इन स्टाफचे प्रस्ताव विद्यापीठास सादर केलेले नाही. तसेच ज्या शिक्षकांची नेमणूक तारखेपासून दोन वर्षानंतर चेंजेस इन स्टाफ फॉर्म विद्यापीठाकडे दाखल करतील अशा शिक्षकांना प्रतीवर्षी रु.१,०००/- प्रमाणे दंड आकारण्यात येते. याबाबत विद्यापीठाचे जा.क्र.: सोविसो / मविविमं / शिमा / २०१०-११ / ३५३५, दि.०६/०८/२०१० रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविले आहे. तसेच यापूर्वी अशा प्रकारे कोणत्याही शिक्षकाचा दंड माफ अथवा कमी करण्यात आलेला नाही.<br>सबब, मा. कुलगुरु महोदयांनी दि.१७/०३/२०२६ रोजीच्या या विभागाच्या मान्यता टिपणीवर दिलेल्या आदेशानुसार श्रीमती सुरांजली लक्ष्मण सोनकांबळे, सहायक प्राध्यापक, कर्मवीर औदुंबर पाटील लॉ कॉलेज, पंढरपूर यांना चेंजेस इन स्टाफ करीता अर्ज करण्यास विलंब झाला असल्याने नियमानुसार रु.१३,०००/- इतका दंड होत असून सदर दंडामध्ये थोडी शिथिलता मिळावी व दंडाची रक्कम कमी करावी याबाबतचा विनंती अर्ज विचारार्थ. | शिक्षक मान्यता विभाग |
| ठराव: | **कर्मवीर औदुंबर पाटील लॉ कॉलेज, पंढरपूर या महाविद्यालयाकडून यासंदर्भात खुलासा मागवून घेण्यात यावा व श्रीमती सुरांजली लक्ष्मण सोनकांबळे, सहायक प्राध्यापक यांचा चेंजेस इन स्टाफचा दंडासह प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ १२ ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या नव्याने बांधण्यात आलेल्या बी ब्लॉक मुलांच्या वसतिगृहातील खोल्यांचे वापर शुल्क आकारण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परीसरात नव्याने बांधण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय मुलांच्या वसतिगृहात प्रत्येक खोली मध्ये दोन बेड, वातानुकूलित यंत्रासह आवश्यक त्या सोई उपलब्ध असलेले एकूण १२ खोल्यांचे अद्यावत वसतिगृह आहे. प्रस्तुत विद्यापीठात बऱ्याच वेळा विविध संकुलांच्या कार्यशाळा, विविध विभागांच्या कार्यक्रमासाठी राज्यातील व राज्याबाहेरील अतिथी / विद्यार्थी विद्यापीठात येत असतात. अशा वेळी बाहेरुन आलेल्यांच्या संशोधक विद्यार्थी / अतिथींच्या राहण्याची व्यवस्था बी ब्लॉक येथे करण्याची मागणी होत असते.<br>प्रस्तुत विद्यापीठ शहरापासून जवळपास १३ कि.मी. अंतरावर असल्याने राज्यातील व राज्याबाहेरील विद्यापीठासंबंधित कामासाठी आलेल्या संशोधक विद्यार्थी, अतिथीना बी ब्लॉक वसतिगृहातील खोल्या नाममात्र शुल्क आकारुन उपलब्ध करुन दिल्यास विद्यापीठात आलेल्या विद्यार्थी / अतिथींच्या निवासाची सोय होवून त्यांना दिलास मिळेल असे वाटते.<br>सबब, विद्यापीठाशी संबंधित विविध कामासाठी आलेल्या संशोधक विद्यार्थी / शासकीय, निमशासकीय शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादी अतिथीची निवास व्यवस्था व्यवस्थापन परिषदेच्या दि. १५ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या बैठकीतील विषय क्रमांक ५(१) व दि. ०४ मार्च, २०२५ रोजीच्या बैठकीतील विषय क्रमांक १ च्या ठरावानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परिसरातील व्ही. आय. पी अतिथीगृह व सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र (संक्रमण सुविधा केंद्रातील) खोल्यांचे सुधारित रु.५००/- एसी रुम या दराप्रमाणे बी ब्लॉक येथील खोल्या निवासासाठी उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ. | मुलांचे वसतिगृह विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या नव्याने बांधण्यात आलेल्या बी ब्लॉक मुलांच्या वसतिगृहातील खोल्यांचे वापर शुल्क हे विद्यापीठ गेस्ट हाऊससाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काप्रमाणे आकारण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १३ ] | प्रस्तुत विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांना वसतिगृहात वास्तव्यास नसल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी रु. ५००/- प्रमाणपत्र शुल्क आकारण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील विविध संकुलांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विविध विषयांतील संशोधक विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती घेण्यासाठी / मिळविण्यासाठी विद्यापीठाच्या वसतिगृहामध्ये वास्तव्यास नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार सदर प्रमाणपत्र देण्यात येते.<br>मात्र, मुलांच्या व मुलींच्या वसतिगृहाशी संबंधित कार्यालयीन कामकाजाकरिता स्वतंत्र कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच प्रमाणपत्र तयार करण्यासाठी आवश्यक असलेली स्टेशनरी व त्यावरील खर्च अधिक प्रमाणात होत असल्याने, वसतिगृहात वास्तव्यास नसल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी रु.५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) इतके शुल्क आकारण्याची बाब विचारार्थ. | वसतिगृह विभाग |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठातील संशोधक विद्यार्थ्यांना वसतिगृहात वास्तव्यास नसल्याचे प्रमाणपत्र देण्यासाठी रु. १००/- इतके प्रमाणपत्र शुल्क आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १४ ]</td><td>प्रस्तुत विद्यापीठाच्या वसतिगृह शुल्कात वाढ करण्याची बाब विचारार्थ.<br><br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परीसरात खालीलप्रमाणे चार वसतिगृहे आहेत.<br><br>
<table>
<tr><td>मातोश्री मुलांचे वसतिगृह</td><td>ए ब्लॉक मुलांचे वसतिगृह</td><td>बी ब्लॉक मुलांचे वसतिगृह</td><td>मुलींचे वसतिगृह</td></tr>
<tr><td>३६ खोल्यांचे</td><td>२० खोल्यांचे</td><td>१२ खोल्यांचे</td><td>९६ खोल्यांचे</td></tr>
<tr><td>विद्यार्थी क्षमता १०८</td><td>विद्यार्थी क्षमता ४०</td><td>विद्यार्थी क्षमता २४</td><td>विद्यार्थी क्षमता २८८</td></tr>
</table>
<br>सदर मुलांचे / मुलींचे वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सद्यस्थितीत प्रथम वर्ष Sem I - ३,६००/-, Sem II - ३,०००/- असे एकूण वार्षिक ६,६००/- इतके वसतिगृह शुल्क आकारण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत वाढती महागाई व या महागाईच्या काळात विद्यार्थ्यांना वसतिगृहातील सोईसुविधा उपलब्ध करुन देणे कठीण होत आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना अत्याधिक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता वसतिगृह शुल्कात वाढ केल्यास विद्यार्थ्यांना अत्याधिक सोई सुविधा उपलब्ध करुन देणे शक्य होणार आहे. त्यामुळे वसतिगृह शुल्कात वाढ करण्याची बाब प्रशासनाच्या विचाराधीन आहे.<br><br>सबब, वसतिगृह शुल्कात वाढ करण्याची बाब विचारार्थ.</td><td>वसतिगृह विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>प्रस्तुत विद्यापीठाच्या वसतिगृह शुल्कात खालीलप्रमाणे वाढ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br><br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>वर्ष</th><th>शुल्क</th><th>एकूण वार्षिक शुल्क</th></tr>
<tr><td>१.</td><td>प्रथम वर्ष Sem I</td><td>४,०००/-</td><td rowspan="2">७,०००/-</td></tr>
<tr><td>२.</td><td>प्रथम वर्ष Sem II</td><td>३,०००/-</td></tr>
</table>
<br>तसेच वसतिगृहामध्ये प्रवेश घेतेवेळी संबंधित विद्यार्थी / विद्यार्थीनीकडून मेस वापराबाबतचे प्रमाणपत्र घेऊन परतावा स्वरुपामध्ये किती रक्कम सुरक्षा ठेव म्हणून घेण्यात यावी व इतर अनुषंगिक बाबी ठरविण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.<br>१) प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे<br>२) डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर<br>३) डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | | विभाग |
|---|---|---|---|
| [ १५ ] | दि.२४/०४/२०२६ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत दि.२४/०४/२०२६ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला कार्यवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: दि.२४/०४/२०२६ रोजी झालेल्या खरेदी समितीचा बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No. S.३२४ नुसार वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार खरेदी समितीचा कार्यवृत्तांत दि.२४/०४/२०२६ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीसमोर ठेवण्यात आला होता. त्यास वित्त व लेखा समितीने संपूर्ण कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.<br>सबब, दि.२४/०४/२०२६ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत दि.२४/०४/२०२६ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला कार्यवृत्तांत विचारार्थ. | | खरेदी व भांडार विभाग |
| ठराव: | दि.२४/०४/२०२६ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांतातील विषय क्र. ३ व ८(१) वरील ठरावामध्ये दुरुस्तीसह कार्यवृत्तांतास दि.२४/०४/२०२६ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | | |
| | ३ | १. पीएम-उषा अंतर्गत मंजूर झालेल्या निधीमधून विविध अद्ययावत उपकरणे खरेदी करण्यासाठी GeM Portal वर Bunch Bid पध्दतीने Bunch १, २ साठी न्युनतम ठरलेल्या C.Abhay Kumar & Company, Mumbai फर्मला वाटाघाटी नंतरच्या अंतिम दराप्रमाणे रु.१८,२५,२४,२३०/- व Bunch ३ साठी M/s. Optilab Technologies Pvt. Ltd., Mumbai वाटाघाटी नंतरच्या अंतिम दराप्रमाणे रु.२,५८,७४,०००/- इतक्या रकमेचे तीन Bunch मिळून एकूण १४ उपकरणे खरेदी करण्याची व Tender Document मधील All Terms & Condition नुसार पुरवठा आदेश देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>२. सदर उपकरणांसाठी पीएम-उषा अंतर्गत मंजूर निधीपेक्षा अधिक रु.१.३३ कोटी इतकी रक्कम विद्यापीठ फंडातून खर्ची टाकण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | ८(१) | प्रस्तुत विद्यापीठ ४८२ एकर परिसरातील नवीन विस्तारीत प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन इमारतीमध्ये Data Centre ची सेवा / खरेदी या कामाकरिता न्युनतम असलेल्या M/s. Vintech Electronic Systems Pvt. Ltd., Pune या फर्मला कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी व्यवस्थापन परिषद बैठकीसमोर वाटाघाटीसाठी (Negotiation) आमंत्रित करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १६ ] | **दि.२४/०४/२०२६ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.२४/०४/२०२६ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>सबब, विद्यापीठ परिनियम S.३३९ (f) नुसार इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार दि.२४/०४/२०२६ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **दि.२४/०४/२०२६ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>• **इमारत व बांधकाम समितीच्या कार्यवृत्तांतातील विषय ७ मधील न्युनतम असलेल्या फर्मला वाटाघाटी (Negotiation) करण्यासाठी इमारत व बांधकाम समितीसमोर बोलविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १७ ] | दि.२७/०४/२०२६ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या तातडीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: विद्यापीठ परिसरातील विविध इमारत व बांधकाम करणे कामाकरीता दि.२७/०४/२०२६ रोजी इमारत व बांधकाम समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.<br>सबब, विद्यापीठ परिनियम S.३३९ (f) नुसार इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्याची तरतूद आहे. त्यानुसार दि.२७/०४/२०२६ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | दि.२७/०४/२०२६ रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>• इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीमधील विषय १ बाबत खालील गठीत केलेल्या आढावा समितीसमोर ठेवून त्यांच्या शिफारशीसह कार्यारंभ आदेश देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | समितीचे सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | अध्यक्ष |
| २) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य |
| ५) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य |
| ६) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य |
| ७) | कुलसचिव | सदस्य सचिव |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १८ ] | **विद्यापीठातील विद्यार्थी / शिक्षक / कर्मचारी यांचेकरिता सैफुल ते विद्यापीठ सशुल्क बस सेवा सुरु करणेबाबतचा प्रा. डॉ. जी. एस. कांबळे, डॉ. पी. एन. कोळेकर व डॉ.यु.व्ही.मेटकरी या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठाला देणगी स्वरुपात देण्यात आलेल्या बसचा प्रस्तुत विद्यापीठातील सोलापूर शहरामधून येणाऱ्या विद्यार्थी / शिक्षक / कर्मचारी / अधिकारी यांचेकरिता बस सेवा सुरु करण्याच्या अनुषंगाने बसची वेळ, बसचा मार्ग, बस प्रवास सेवा प्रति महिना भाडे, कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी बस सेवा सुरु ठेवणे तसेच कार्यालयीन कामकाजासाठी कार्यालयीन वेळेअगोदर येणाऱ्या व कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयीन कामकाजासाठी थांबणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता बस सेवा देणे या तसेच त्या अनुषंगाने इतर सर्व बाबींचा सर्वंकष अभ्यास करुन त्याचा अहवाल देण्याकरीता प्रा. डॉ. जी. एस. कांबळे, डॉ. पी. एन. कोळेकर डॉ. यु. व्ही. मेटकरी यांची त्रिसदस्यीय समिती गठीत करुन मिळाली होती.<br>वरीलप्रमाणे त्रिसदस्यीय समितीने बैठक घेऊन निरीक्षणे नोंदवून शिफारशी केल्या आहेत. तसेच प्रपत्रे देखील तयार केली आहेत. सदरप्रमाणे त्रिसदस्यीय समितीने दिलेला अहवाल सोबत जोडला आहे.<br>सबब, विद्यापीठातील विद्यार्थी / शिक्षक / कर्मचारी / अधिकारी यांचेकरिता सैफुल ते विद्यापीठ सशुल्क बस सेवा सुरु करणेबाबतचा प्रा. डॉ. जी. एस. कांबळे, डॉ.पी.एन.कोळेकर व डॉ. यु. व्ही. मेटकरी या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **विद्यापीठातील विद्यार्थी / शिक्षक / कर्मचारी यांचेकरिता सैफुल ते विद्यापीठ सशुल्क बस सेवा सुरु करणेबाबतचा प्रा. डॉ. जी. एस. कांबळे, डॉ. पी. एन. कोळेकर व डॉ.यु.व्ही.मेटकरी या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १९ ] | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील एम.ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमास दि.१६/०२/२०२६ रोजीच्या विद्यापरिषदेने ठराव क्र. १२ अन्वये शैक्षणिक वर्ष २००७-०८ ते २०१५-१६ या नऊ वर्षाकरिता संलग्निकरणास मान्यता दिल्याची बाब विचारात घेवून, उक्त महाविद्यालयातील कायम विनाअनुदानित तत्वावरील एम.ए. (इंग्रजी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन शासनास शिफारस करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: मा. सचिव, विद्या विकास मंडळ, करमाळा यांनी संस्थेचे संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील एम. ए. (इंग्रजी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. | संलग्नता विभाग |

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव | बंद करावयाचा अभ्यासक्रम | बंद करावयाचे वर्ष | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| विद्या विकास मंडळ, करमाळा, जि. सोलापूर | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि. सोलापूर | एम. ए. (इंग्रजी) | शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून | कायम विना अनुदानित |

सदर महाविद्यालयातील एम.ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमास शासन पत्र क्र. अमवि २००६ / (०५/०६)/मशि-३, दि. ३ जून, २००६ अन्वये महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मिळाली होती. त्याअनुरोधाने प्रस्तुत विद्यापीठाने शासन मान्यतेच्या अनुषंगाने व स्थानिक चौकशी समितीने सुचवलेल्या अटींच्या अधिन राहून सदर अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता दिली होती.

तथापि, सदर अभ्यासक्रमास आवश्यक असणारी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नसल्याने संस्थेने संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील एम. ए. (इंग्रजी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमूद केले आहे.

सदर अभ्यासक्रम बंद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी दि. १६/०८/२०१४ रोजीच्या विद्यापरिषदेच्या ठराव क्र. ११३(१४) नुसार मा. कुलगुरु महोदयांनी खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त केली होती.

१. डॉ. एन. बी. पवार (अध्यक्ष)
२. डॉ. श्रीमती ॲनी जॉन (सदस्य)
३. श्रीमती एम. व्ही. पत्की (सदस्य)

सदरील समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देवून अहवाल दि.२७/०३/२०१५ रोजी विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील एम.ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमास २००९-१० पासून विद्यार्थी संख्या नसल्याने, २०१५ पर्यंत विद्यार्थी संख्या मिळेल अशा आशेमुळे संलग्निकरण घेतले होते.

परंतु संस्थेने सदरील अभ्यासक्रम बंद करण्याचा ठराव केला असल्यामुळे, सदर पदव्युत्तर वर्गास कुठलाही कायम शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी नेमलेला नसल्याने व एकही विद्यार्थी प्रवेशित नसल्यामुळे महाविद्यालयाच्या विनंतीनुसार एम.ए. (इंग्रजी) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम बंद करण्याची शिफारस सदरची स्थानिक चौकशी समिती करीत आहे, असे नमूद केले आहे.

त्याच दरम्यान महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे हित व पालकांची मागणी विचारात घेवून एम. ए. (मराठी) व (हिंदी) या अभ्यासक्रमांच्या बंदच्या प्रस्तावांवरील पुढील कार्यवाही स्थगित करुन सदर अभ्यासक्रम पुनःश्च चालू करण्याबाबतची कार्यवाही करण्याविषयी विनंती केली होती.

सदर प्रकरणी कार्यवाही सुरु असताना तत्कालीन मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार महाविद्यालयातील सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची माहिती मागवून घेण्यात आली होती. त्यासअनुसरुन महाविद्यालयाने सादर केलेली माहिती लक्षात घेता असे निर्दशनास आले की, महाविद्यालयाने एम. ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमास फक्त प्रथम संलग्निकरण घेतले असून त्यापुढे त्याचे संलग्निकरणाचे नुतनीकरण व नैसर्गिक विस्तार करुन घेतले नाही. महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० पर्यंत विद्यापीठाचे संलग्निकरण नसतानाही विद्यार्थी प्रवेश दिल्याचे व सदर विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून आले. तसेच महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून एम. ए. (इंग्रजी) भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव देखील सादर न करताच विद्यार्थ्यांना प्रवेश दिला असल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून आले.

सदरील गंभीर बाब विचारात घेता, महाविद्यालयाने एम. ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २००७-०८ ते २०१४-१५ पर्यंतचे संलग्निकरणाचे प्रस्ताव विद्यापीठास सादर न केल्यामुळे त्यादरम्यानच्या कालावधीतील संलग्निकरणास मान्यता देण्याची बाब प्रलंबित होती. तसेच शैक्षणिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० पर्यंत संलग्निकरण नसताना विद्यार्थी प्रवेश होवून पास होवूनही गेले असल्याने, विना संलग्निकरण प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पदवी वैधताबाबत काही तांत्रिक अडचणी उद्भवू नये याकरिता संलग्निकरणाची पोकळी (GAP) भरुन न काढता थेट शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून अभ्यासक्रम बंदच्या प्रस्तावावरील पुढील कार्यवाही करणे संयुक्तिक होणार नाही यासाठी अभ्यासक्रम बंदच्या प्रस्तावावरील कार्यवाही तात्पुरत्या स्वरुपात स्थगित (Hold) ठेवण्यात आली होती.

याबाबत महाविद्यालयाशी केलेल्या पत्रव्यवहाराअंती, दि. २८/०४/२०२५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. २ नुसार शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून एम. ए. (इंग्रजी) भाग १ चे संलग्निकरणाचे नुतनीकरण व भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराच्या प्रस्तावासंदर्भात दंडाची रक्कम माफ करुन, शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून २०१४-१५ पर्यंत प्रति वर्षाप्रमाणे संलग्नता शुल्क (संलग्निकरणाचे नुतनीकरण व नैसर्गिक विस्ताराचे एकत्रित प्रस्ताव व एकत्रित शुल्क रु. ५,०००/- याप्रमाणे ८ वर्षाचे) आकारुन प्रस्ताव स्विकारण्यात आला होता. त्याअनुरोधाने नियुक्त केलेल्या स्थानिक चौकशी समितीच्या शिफारशी अंती दि.१६/०२/२०२६ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. १२ नुसार विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो / संलग्नता/ २०२५-२६/२०८२, दि. ०७/०३/२०२६ अन्वये एम.ए. (इंग्रजी) भाग १ चे संलग्निकरणाचे नुतनीकरण व भाग २ च्या नैसर्गिक विस्तारास शैक्षणिक वर्ष २००७-०८ ते २०१५-१६ या नऊ वर्षाकरिता मान्यता देण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| | त्याअनुरोधाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१(३) (४) मधील तरतुदीनुसार सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून बंद करण्यासंदर्भात दि.०७/०४/२०२६ रोजीच्या विद्यापरिषदेने ठराव क्र. २४ अन्वये व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.<br>सबब, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील एम. ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमास दि. १६/०२/२०२६ रोजीच्या विद्यापरिषदेने ठराव क्र. १२ अन्वये शैक्षणिक वर्ष २००७-०८ ते २०१५-१६ या नऊ वर्षाकरिता संलग्निकरणास मान्यता दिल्याची बाब विचारात घेवून, उक्त महाविद्यालयातील कायम विनाअनुदानित तत्वावरील एम. ए. (इंग्रजी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन शासनास शिफारस करण्याची बाब विचारार्थ. |
| ठराव: | **यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील एम.ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमास दि.१६/०२/२०२६ रोजीच्या विद्यापरिषदेने ठराव क्र. १२ अन्वये शैक्षणिक वर्ष २००७-०८ ते २०१५-१६ या नऊ वर्षाकरिता संलग्निकरणास मान्यता दिल्याची बाब विचारात घेवून, उक्त महाविद्यालयातील कायम विनाअनुदानित तत्वावरील एम.ए. (इंग्रजी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन शासनास शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२०(१)] | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९८.१ नुसार खरेदी समिती सुधारीत करण्याची बाब विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९८.१ नुसार ज्यामध्ये प्रत्येक बाबीचे स्वतंत्र मूल्य एकावेळी दहा लाखाहून अधिक असेल अशा विद्यापीठाच्या खरेदीच्या सर्व बाबी हाताळण्यासाठी एक खरेदी समिती असेल असे नमूद केले आहे, त्यानुसार सद्यस्थितीत कलम ९८.२ नुसार खालीलप्रमाणे समिती कार्यरत आहे.

| अ.क्र. | पद | नाव |
|---|---|---|
| १) | म.सा.वि.अ. कलम ९८(२) (क) - कुलगुरु - अध्यक्ष | मा. डॉ. प्रकाश महानवर - अध्यक्ष |
| २) | म.सा.वि.अ. कलम ९८(२) (ख) - प्र-कुलगुरु - सदस्य | प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा - सदस्य |
| ३) | म.सा.वि.अ.९८(२)(ग) - व्यवस्थापन परिषदेवरील कुलपतीने नामनिर्देशित केलेली व्यती - सदस्य | प्रा. देवानंद चिलवंत - सदस्य |
| ४) | म.सा.वि.अ.९८(२)(घ) - व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले विद्यीपठ विभागांचे व विद्यापीठ परिसंस्थाचे दोन प्रमुख - सदस्य | प्रा. व्ही. बी. पाटील - सदस्य<br>डॉ. श्रीमती ए. एस. लावंड-सदस्य कार्यरत आहेत. |
| ५) | म.सा.वि.अ.९८(२)(ङ) - व्यवस्थापन परिषदेने त्या सदस्यांच्या निर्वाचित सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला एक सदस्य | श्री. सचिन गायकवाड |
| ६) | म.सा.वि.अ.९८(२)(च) - कुलगुरुने प्राध्यान्याने उद्योग समुहातील सामग्री व्यवस्थापन क्षेत्रातील नामनिर्देशित केलेला एक तज्ञ - सदस्य | श्री. एम. केशवा रेड्डी<br>तत्कालीन कुलगुरु महोदय यांनी नामनिर्देशन केले आहे. |
| ७) | म.सा.वि.अ. कलम ९२(२) (छ) - कुलसचिव - सदस्य | डॉ. अतुल लकडे - सदस्य |
| ८) | म.सा.वि.अ.कलम ९८(२) (ज) - वित्त व लेखा अधिकारी - सदस्य-सचिव | सीए. डॉ. महादेव खराडे - सदस्य-सचिव |

सदर समितीतील म.सा.वि.अ. कलम ९८(२) (च) - कुलगुरुने प्राध्यान्याने उद्योग समुहातील सामग्री व्यवस्थापन क्षेत्रातील नामनिर्देशित केलेला एक तज्ञ - सदस्य श्री. एम. केशवा रेड्डी हे त्यांच्या कार्य व्यस्ततेमुळे बऱ्याच बैठकांना उपस्थित राहू शकले नाहीत. तसेच म.सा.वि.अ. कलम ९८(२) (घ) - व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले विद्यापीठ विभागांचे व विद्यापीठ परिसंस्थांचे दोन प्रमुख - सदस्य पैकी सद्या कार्यरत. डॉ. श्रीमती ए. ए. लावंड हे सद्या विभागप्रमुख नाहीत, त्यामूळे सदरील बाब विचारार्थ.

| | | | |
|---|---|---|---|
| | सबब, वरीलप्रमाणे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९८.१ नुसार खरेदी समिती सुधारीत करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. त्यानुसार वरीलप्रमाणे खरेदी समिती सुधारीत करण्यास व ज्याठिकाणी नामनिर्देशन करावयाचे आहे त्याठिकाणी नामनिर्देशन होवून मिळण्यास विचारार्थ. | | |
| ठराव: | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९८.१ नुसार खरेदी समिती सुधारीत करुन सर्वानुमते खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले. | | |

| अ.क्र. | पद | नाव |
|---|---|---|
| ४) | म.सा.वि.अ.९८(२)(घ) - व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले विद्यीपठ विभागांचे व विद्यापीठ परिसंस्थाचे दोन प्रमुख - सदस्य | प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील<br>प्रा. डॉ. जी. एस. कांबळे |
| ५) | म.सा.वि.अ.९८(२)(ङ) - व्यवस्थापन परिषदेने त्या सदस्यांच्या निर्वाचित सदस्यांमधून नामनिर्देशित केलेला एक सदस्य | श्री. सचिन गायकवाड |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[२०(२)]</td><td>सर्वोच्च न्यायालय व पर्यावरण मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार घनकचरा व्यवस्थापन वर आधारित स्पर्धा व उपक्रम घेण्याची बाब विचारार्थ.</td><td>संलग्नता विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>सर्वोच्च न्यायालय व पर्यावरण मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्वानुसार घनकचरा व्यवस्थापनवर आधारित स्पर्धा व उपक्रम घेण्याबाबत सर्व संलग्नित महाविद्यालयांना (स्वायत्य महाविद्यालयांसह) सदरचे उपक्रम राबविण्याकरीता प्रवेश फी रु.२,०००/- आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच या उपक्रमाच्या बक्षिसांचा क्रम सर्वानुमते खालीलप्रमाणे ठरविण्यात आला.<br><table><tr><th>अ.क्र.</th><th>महाविद्यालय संख्या</th><th>रक्कम</th></tr><tr><td>१)</td><td>०२ महाविद्यालय</td><td>प्रत्येकी ५०,०००/-</td></tr><tr><td>२)</td><td>०२ महाविद्यालय</td><td>प्रत्येकी २५,०००/-</td></tr><tr><td>३)</td><td>०२ महाविद्यालय</td><td>प्रत्येकी १२,५००/-</td></tr></table></td><td></td></tr>
</table>

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२०(३)] | विद्यापीठाकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक पत्रावर DGMS नंबर देण्याची बाब विचारार्थ. | आवक जावक विभाग |
| ठराव: | विद्यापीठाकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक पत्रावर DGMS नंबर देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. | |

मा. कुलगुरु, मा.प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद